# शिक्षणासाठी मातृभाषेचा आग्रह धरणे आवश्यक

## राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांचे मत

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** नव्या शैक्षणिक धोरणात मातृभाषेत शिकण्याची तरतूद आहे. मातृभाषेतील शिक्षणामुळे विद्यार्थ्यांच्या मनात शैक्षणिक मूल्ये आणि अभ्यासक्रमाच्या तत्त्वांचे उत्तम आकलन होते. इंग्रजीचे शिक्षण आवश्यक असले, तरी शिक्षणासाठी मातृभाषेचा आग्रह धरायला हवा. आधुनिकीकरण स्वीकारताना मातृभूमी, मातृभाषा, सदाचार आणि संस्कृतीला विसरता कामा नये, असे मत राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी मंगळवारी मांडले.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या समारोप कार्यक्रमात कोश्यारी बोलत होते. महापौर मुरलीधर मोहोळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, सहकार्यवाह प्रा. ज्योत्स्ना एकबोटे, प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंझारराव आदी या वेळी उपस्थित होते. महाविद्यालयातील अत्याधुनिक प्रयोगशाळा, प्राचार्य आभासी कक्षाचे उद्घाटन आणि सुवर्ण महोत्सवी विशेषांकाचे प्रकाशन कोश्यारी यांनी केले.



राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते डॉ. गजानन एकबोटे यांना गौरवपत्र प्रदान करण्यात आले.

कोश्यारी म्हणाले की, नावीन्यपूर्ण संशोधनासाठीचे एकस्व अधिकार (पेटंट) देशांना मिळत आहेत. त्यामुळे परदेशातील एकस्व अधिकारांची संख्या मोठी आहे. त्या तुलनेत देशात एकस्व अधिकारांचे प्रमाण फारच कमी आहेत. त्यासाठी मॉडर्न महाविद्यालयासारख्या संस्थांनी 'मॉडेल' झाले पाहिजे. आपल्याकडील प्राचीन ज्ञान, योगाकडे जग पाहात आहे. त्यामुळे मॉडर्न होताना जुन्याची कास सोडून चालणार नाही.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीची वाटचाल आता स्वायत्त विद्यापीठाच्या दिशेने होत आहे. विद्यापीठातील अनेक नावीन्यपूर्ण संकल्पना मॉडर्न महाविद्यालयातूनच झाल्याचे डॉ. करमळकर यांनी सांगितले.

### मराठीतच बोला...

महाविद्यालयाच्या पन्नास वर्षांच्या वाटचालीची प्रास्ताविकातून माहिती देताना प्रा. ज्योत्स्ना एकबोटे यांनी राज्यपालांना समजावे यासाठी इंग्रजी आणि हिंदीचा आधार घेतला. त्यावेळी राज्यपालांनी त्यांना मराठीतूनच बोलण्यास सांगितले.

लोकसत्ता
Wed, 20 January 2021
https://epaper.loksatta.com/c/57849372